# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९/११९०
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/१७२

दिनांक – २५/२/२०१२

**अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित**

प्रति,
मा. प्राचार्य,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये.

विषय – मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ – शासन पत्र क्र.ससं/उशि/पुवि/मागासवर्गीय अनुशेष/२०१२/४६३, दि २४/२/२०१२
या कार्यालयाचे परिपत्रक क्र.आरक्षण/ओ २२/९८, दि. १/२/२०१२.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी शिक्षक व शिक्षकेतर पदांचा अनुशेष मार्च २०१२ पर्यंत भरण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. शासन निर्णयाची प्रत सर्व संबंधित महाविद्यालये/संस्थांना कार्यवाहीसाठी यापूर्वीच पाठविण्यात आलेली असून या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये माहिती मागविण्यात आलेली आहे. तथापि, अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

या कार्यालयाच्या उपरोक्त परिपत्रकासोबत जोडलेल्या प्रपत्रात अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनुशेषाची माहिती शासनास तातडीने सादर करावयाची असून सोबत शासन पत्र व अनुदानित महाविद्यालयाची यादी जोडत आहे.

तरी अनुदानित महाविद्यालयांनी शासनाने मंजूर केलेल्या पदानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये विषयनिहाय व प्रपत्र 'ब' मध्ये पदनिहाय माहिती तयार करुन पेनड्राईव्ह व हार्डकॉपीसह या कार्यालयास दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ पूर्वी हस्तपोच देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत – प्रपत्र 'अ' व 'ब'

सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

पुणे विद्यापीठ संलग्नीत अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील अनुशेषाची माहिती

महाविद्यालयाचे नाव - आय डी नं

शिक्षक संवर्ग प्रपत्र अ

| अ.क्र | पदाचा प्रवर्ग | विषय | मंजूर पदांची संख्या | टक्केवारीनुसार जाणारी पदे | | | | | | | | | | दि. ३०/०६/२०११ रोजीची कार्यरत पदसंख्या | | | | | | | | | | दिनांक ३०/०६/२०११ अखेर शिल्लक आरक्षण | | | | | | | | | | शिल्लक आरक्षणानुसार दि.३१/१/२०१२ अखेर भरलेली पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण |
| | | | | | | | अ | ब | क | ड | | | | | | | अ | ब | क | ड | | | | | | | अ | ब | क | ड | | | | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | प्राचार्य | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | सहायक प्राध्यापक | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | विषयनिहाय | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

शिक्षकेतर संवर्ग प्रपत्र ब

| अ.क्र | पदाचा प्रवर्ग | मंजूर पदांची संख्या पदनिहाय | टक्केवारीनुसार जाणारी पदे | | | | | | | | | | दि. ३०/०६/२०११ रोजीची कार्यरत पदसंख्या | | | | | | | | | | दिनांक ३०/०६/२०११ अखेर शिल्लक आरक्षण | | | | | | | | | | शिल्लक आरक्षणानुसार दि.३१/१/२०१२ अखेर भरलेली पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण | खुला | अ.जा. | अ.ज. | विजाभज | | | | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण |
| | | | | | | अ | ब | क | ड | | | | | | | अ | ब | क | ड | | | | | | | अ | ब | क | ड | | | | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | गट अ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | गट ब | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | गट क | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | गट ड | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

टीप - १ ज्या संस्थेची एकापेक्षा जास्त महाविद्यालये आहेत अशा संस्थेची एकत्रित बिंदूनामावली तपासून देण्यात आलेली असल्याने त्यानुसार एकत्रित माहिती सादर करावी

२ कायमस्वरुपी विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांचाच कार्यरत पदसंख्येत समावेश असावा

३ शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील सरळसेवा व पदोन्नतीची माहिती स्वतंत्र प्रपत्रात देण्यात यावी

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
### ९७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-९
Web: www.jdhepune.org

फोन नं.०२०-२६१२७८३३/२६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/मागासवर्गीय अनुशेष/२०१२/ 463     दिनांक २४.०२.२०१२

अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित

प्रति,
कुलसचिव,
पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे ७.

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - 24|2|12 आवक क्र.- 240
विभाग -

विषय — अशासकीय अनुदानित महाविद्यालयाचा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनुशेषाची माहिती सादर करणेबाबत..

संदर्भ — मा. संचालनालयाचे क्र. उशिसं/२०१२/मागासवर्गीय अनुशेष/मवि-१/१४९५, दिनांक २३.०२.२०१२ चे पत्र.

उपरोक्त विषयाचे मा. संचालनालयाचे संदर्भिय पत्र सोबत जोडलेले आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, पुणे विभागातील अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र (पुणे जिल्हा, अहमदनगर जिल्हा, नाशिक जिल्हा) एकूण १६५ महाविद्यालयांची यादी सोबत जोडलेली आहे. तसेच सन २००९-२०१० या वर्षाचे दि.१.१०.२०१० च्या विद्यार्थी संख्येवर आधारित शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनिश्चितीचे तक्ते **पेन ड्राईव्ह (Pen Drive) मध्ये** पाठवित आहे. तरी मा.संचालनालयाने दिलेल्या निर्देशानुसार, कालमर्यादित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनुशेषाची माहिती **दोन प्रतीत तसेच सी.डी.सह त्वरीत** खास दुतामार्फत पाठविण्यात यावी.

(डॉ.एन.एम.कडू)
सहसंचालक,(उच्च शिक्षण)
पुणे विभाग,पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांस माहितीस्तव सविनय सादर.
प्रत - आरक्षण कक्ष पुणे विद्यापीठ पुणे

उच्च शिक्षण
309
9 FEB 2012

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dirhe.org.in
E-Mail : Info@dirhe.org.in
फोन नं.०२०/२६१२२१११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.उशिसं/२०१२/मागासवर्गीय अनुशेष/मवि-१/१४१५ दिनांक-२३/२/२०१२

अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित

प्रति,

कुलसचिव
सर्व अकृषिक विद्यापिठे

**विषयः अशासकीय अनुदानित महाविद्यालयाचा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची अनुशेषाची माहिती सादर करणेबाबत.**

संदर्भ :१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन प्रत्र
क्र:मावक-२०११/प्र.क्र.४६-२०११/आस्था-२ दि.२९-१०-२०११

उपरोक्त विषयासंबधिचे संदर्भिय पत्र काळजीपुर्वक पहावे सदर पत्राची प्रत सर्व कुलसचिव अकृषिक विद्यापिठे यांना दिलेली आहे. या पत्रासोबत गट अ,ब,क,ड सरळसेवा व पदोन्नतीच्या पदांची मागासवर्गीय अनुशेषाची माहिती सादर करणेबाबतची प्रपत्रे एकूण पाने ४ आहेत. सदरचे पत्र व सोबतची प्रपत्रे विद्यापीठामध्ये उपलब्ध आहेत. याप्रपत्रामध्ये अशासकीय अनुदानित महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा सरळसेवा व पदोन्नतीची मंजूर कार्यरत व रिक्त पदे व अनुशेषाची पदे याबाबतची माहिती संकलित करावायची आहे. सदरची माहिती अचूक तयार करुन शासनास सादर करावयाची आहे. तथापि सदरची अशासकीय अनुदानित महाविद्यालयांची म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, विधी बी.एड. व गृहविज्ञान अनुदानित विद्याशाखेची माहिती संकलित करुन शासनास सादर केलेली नाही.

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी उपरोक्त शासन पत्रानुसार येणारा अनुशेष मार्च २०१२ पर्यंत भरणेची कार्यवाही करणेबाबत निदेश दिलेले आहेत. तथापि, तुम्ही यापत्राचे गांभिर्य विचारात घेतलेले नाही. कारण अशासकीय अनुदानित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना त्या महाविद्यालयामध्ये संदर्भीय पत्रासोबतच्या प्रपत्रानुसार कोणत्या गटाचा पदाचा किती अनुशेष आहे? हे कळविलेले नाही. .त्यामुळे मार्च २०१२ अखेर सरळसेवा व पदोन्नतीचा अनुशेष भरला न गेल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपणावर राहील व या निष्काळजीपणास आपणास जबाबदार धरण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची अनुशेषाची माहिती सादर करावयाची आहे. तरी अशासकीय अनुदानित महाविद्यालयनिहाय सदरची माहिती संदर्भीय पत्राच्या प्रपपत्रात संकलित करावी व त्याचा गोषवारा काढून गोषवा-यासह सदरची माहिती

सात दिवसात सादर करावी. याकामासाठी विद्यापीठातील बी.सी.सेल विभागास इतर विभागातील मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे. सदरची माहितीसादर करण्यास कुचराई केल्यास आपण मागासवर्गीयीचा अनुशेष भरण्यास सहकार्य केलेले नाही. व शासनाने दिलेल्या निर्देशाचे अनुपालन केलेले नाही म्हणुन आपल्या विरुध्द कारवाही करण्याबाबत मा. कुलगुरु महोदयांना शासनामार्फत कळविण्यात येईल याची वैयक्तीक नोंद घ्यावी.

कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, गृहविज्ञान या विद्याशाखेच्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयाची माहिती महाविद्यालय निहाय संकलित करुन सात दिवसात सादर करण्यात यावी याची नोंद घ्यावी. यासाठी संबंधित सहसंचालक कार्यालयाकडून महाविद्यालयनिहाय अनुदानित महाविद्यालयाची विषयनिहाय शिक्षक व शिक्षकेतर अनुज्ञेय पदाची माहिती देणेस सहसंचालक यांना सूचना दिलेल्या आहेत. सदर पत्र मिळाल्याबाबत पोहोच द्यावी.

23/2/2012

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत---मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांना सविनय सादर
प्रत---मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना सविनय सादर
प्रत---सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, यांना अग्रेषित